# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur.dte@gmail.com

अति महत्वाचे

क्रमांक :- तंशिसं/विकाना/शैवि/वृक्ष लागवड/२०१६ /2713
दिनांक :- 26 SEP 2016

प्रति,
प्राचार्य/संचालक
-----------------------------
-----------------------------
-----------------------------
(सर्व शासकीय, अनुदानित विना अनुदानित खाजगी पदविका अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र संस्था, नागपूर जिल्हा)

विषय :- १ जुलै २०१६ रोजी लागवड केलेल्या रोपांची माहिती विवरणपत्रात पाठविणेबाबत.

संदर्भ :- १) उपसंचालक, सामाजिक बनीकरण विभाग, नागपूर यांचे पत्र क्र. साबवि/ना/योजना/१६-१७/३६६, दि. ०३.०९.२०१६.
२) उपसंचालक, सामाजिक बनीकरण विभाग, नागपूर यांचे पत्र क्र. साबवि/ना/योजना/१६-१७/८८७, दि. १९.०९.२०१६.
३) या कार्यालयाचे पत्र क्र तंशिसं/विकाना/शैवि/वृक्ष लागवड/२०१६/२६८७, दि २० सप्टेंबर २०१६

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेत सन २०१६ मधील पावसाळयात वन महोत्सव कालावधीमध्ये दि. १ जुलै २०१६ या एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविण्यांत आला. बहुतांश संस्थेने या उपक्रमात उत्स्फुर्त सहभाग घेऊन वृक्षरोपणाचे उदिदृष्ट पूर्ण केलेत.

या कार्यालयाने संदर्भ क्र ३ अन्वये विवरणपत्र-२ मध्ये माहिती भरुन तसेच वृक्षारोपन केल्यानंतर आजपर्यंत जिवंत रोपांची फोटो स्कॅन करुन कार्यालयाचे मेलवर पाठविण्यांबाबत कळविलेले होते परंतु बहुतांश संस्थेनी वृक्षारोपन केल्याचे स्कॅन फोटो पाठविलेली आहेत तरी सोबत जोडलेल्या विवरणपत्र-२ मध्ये माहिती भरुन, व दि १ जुलै २०१६ रोजी वृक्षारोपन केल्यानंतर किती रोपे आजपर्यंत जिवंत आहेत, त्या रोपांचे फोटो स्कॅन करुन ronagpur.dte@gmail.com या ई-मेलवर <u>दि. २८.०९.२०१६</u> पर्यंत कुठल्याही परिस्थितीत पाठविण्यांत यावे जेणेकरुन सदरहू माहिती सामाजिक वनिकरण विभाग, नागपूर यांना अति तात्काळ सादर करणे सोईचे होईल.

सहपत्र : विवरणपत्र-२

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रत : १) मा.जिल्हाधिकारी, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीकरीता सविनय सादर.
२) उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नवीन प्रशासकीय इमारत क्र. २ विंग बी, ७ वा माळा, जिल्हा परिषद जवळ, सिव्हील लाईन्स, नागपूर-०१ यांना माहितीकरीता.
३) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का.नागपूर यांना सदरहू पत्र संकेतस्थळावर अपलोड करण्याकरीता.

विवरणपत्र-२

जिल्ह्याचे नांव :

दिनांक १ जुले २०१६ रोजी केलेल्या वृक्षारोपणाची माहिती व वृक्षांचे जिवंत राहण्याचे प्रमाणाची आकडेवारी दर्शविणारे विवरणपत्र.

त्रैमासिक अहवाल

| अ.क्र. | वृक्षारोपनासाठी निवडलेली स्थळे | वन व सामाजिक वनीकरण विभागाकडून प्राप्त झालेल्या रोपांची संख्या | वृक्षारोपनासाठी सहभाग घेतलेल्या यंत्रणा | दि. ०१.०७.२०१६ रोजी केलेल्या लागवडीची रोपे संख्या | जिवंत रोपांची संख्या व टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

प्राचार्यांची सही